# श्री राम चंद्र मिशन
# एकोज इंडिया

नोव्हेंबर २००९ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ६


प्रिय बंधू-भगिनींनो,
प्रणाम.

एकोज इंडिया वार्तापत्राचे सभासदत्व व व्याप्ती यात वृद्धी होत आहे हे सांगण्यास आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. या अंकात प्रकाशित करण्यासाठी जवळ-जवळ सर्व विभागांमधून आम्हाला अनेक लेख पाठविण्यात आले. जुलै २००९ मध्ये झालेल्या एकोज इन्डियाच्या स्वयंसेवकांच्या बैठकीनंतर लेखांचा दर्जा व व्याप्ती यात पुष्कळ सुधारणा झाली आहे. वार्तापत्रातील जागेच्या कमतरतेमुळे लेखांची निवड करणे आमच्याकरिता कठीण काम होते.

पूज्य गुरुदेवांचा आंध्र प्रदेश, उत्तर कर्नाटक व पश्चिम बंगाल येथील प्रवास, कलकत्त्याजवळच्या खरगपूर येथील दुसऱ्या 'क्रेस्टचे (सेन्टर फॉर रिसर्च, एज्युकेशन, साधना अंड ट्रेनिंग)' उद्घाटन हे या अंकाचे विशेष पैलू आहेत.

चेन्नई येथील मणपक्कम आश्रम दिवाळीनिमित्त अनेक कार्यक्रमांचे केंद्र बनला होता.


या अंकात अनेक विभागांमध्ये आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांचा, ओपन हाउस सत्रांचा, बंगलोरमध्ये झालेल्या युवक मेळाव्याचा, विविध विभागातील अभ्यासी सम्मेलनांचा, जयपुर व एर्नाकुलम येथील व्ही.बी. एस.सी. कार्यक्रमांचा तसेच उत्तराखंड येथील प्रशिक्षक बैठकीचा अंतर्भाव आहे. 'प्रकाशाची केंद्रे' या सदरात पनवेल आश्रमाबद्दल माहिती देण्यात आली आहे.

आपल्या कुटुंबातील व आजुबाजूच्या ज्या अभ्यासी बंधु-भगिनींना हा अंक उपलब्ध होत नसेल त्यांना तो वितरीत करावा ही नम्र विनंती !

प्रेमळ सदिच्छांसह,
संपादकीय मंडळ

## चित्तूर

आंध्र प्रदेश व उत्तर कर्नाटकाच्या प्रवासाकरिता पूज्य गुरुदेवांनी बंधू अजय भटट्र यांच्यासहीत रविवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी दुपारी प्रस्थान केले.




चित्तूर आश्रम येथे सुमारे १००० अभ्यासींनी त्यांचे हार्दिक स्वागत केले. तीन तासाच्या प्रवासानंतरही गुरुदेव प्रसन्न व आनंदी दिसत होते. पावसाच्या हलक्याश्या शिडकाव्यामुळे आश्रमाचे शांत वातावरण अधिकच सौम्य झाले होते. आपल्या कुटीराच्या बाहेर संध्याकाळी ५ वाजता त्यांनी सत्संगाचे संचलन केले. दुसऱ्या दिवशीचे सत्संग सकाळी ७.३०, ११.३० व सायंकाळी ५ वाजता होतील असे जाहीर केल गेले. इतर ठिकाणी हाच नित्यक्रम ठरून गेला.

१४ सप्टेंबर रोजी सकाळी उपस्थितांशी अनौपचारिक वार्तालाप करून गुरुदेवांनी





सर्वांना सुखद आश्चर्याचा अनुभव दिला. ते म्हणाले, "आध्यात्मिकतेमध्ये भविष्य असे काही नाही. आपण कसे बनावे याची इच्छा करून आपण आपले स्वत:चे भविष्य निर्माण करत असतो. ही दु:खद गोष्ट आहे की लोक मर्यादित शक्यता असणाऱ्या स्थूल पातळीवर मोठे होण्याचा प्रयत्न करत असतात. आध्यात्मिक पातळीवर अमर्यादित शक्यता असतात. काही गोष्टी आपण योग्य प्रकारे जाणून घेतल्या पाहिजेत. ध्यानामुळे शिस्त निर्माण होते, शुद्धिकरण आपल्याला तयार करते तर प्राणाहुति आपली आध्यात्मिक वाढ करण्यास हातभार लावते. प्रशिक्षकांनी याबाबत बोलले पाहिजे, जे ते क्वचितच करताना दिसतात."

त्याच रात्री भोजनानंतर ८.४५ च्या सुमारास जेव्हा गुरुदेव आपल्या कुटीराबाहेर आले, तेव्हा शांतपणे वाट पहाणाऱ्या अभ्यासींच्या आनंदाला सीमा राहिली नाही. स्वत:चे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज व स्वत:ला भविष्यामध्ये जाण्यासाठी लायक कसे बनवावे यावर ते सुमारे अर्धा तास बोलले.




(संपूर्ण भाषण मिशनच्या वेबसाइटवर वाचता येईल . http://www.sahajmarg.org/literature/online/speeches/reappraise-yourself). १५ सप्टेंबर रोजी गुरुदेवांनी कडप्पा येथे जाण्यासाठी प्रयाण केले).

दुपारी कडप्पा येथे पोहोचल्यावर सुमारे दीड हजाराच्या अभ्यासी समुदायाने गुरुदेवांचे स्वागत केले. ३ एकरांच्या परिसरात, नवीन बांधलेला , सुमारे १००० अभ्यासींची बसण्याची व्यवस्था असणारा ध्यान-कक्ष सुंदर रितीने सजवला होता व विलोभनीय दिसत होता. गुरुदेवांनी ध्यान-कक्षाचे उद्घाटन केले व ४.३० वाजता सत्संगाचे संचलन केले. काही अभ्यासींनी गुरुदेवांना आपल्या मुलांची नावे ठेवण्याची विनंती केली. जातीवाचक नावे गाळण्याची हमी दिलीत, तरच मी मुलांची नावे ठेवीन असे गुरुदेव या प्रसंगी म्हणाले.



१६ सप्टेंबर रोजी या तुलनात्मक दृष्ट्या छोट्या केंद्रातील स्वयंसेवकांनी केलेल्या प्रशंसनीय कार्याबद्दल त्यांना आशीर्वाद देऊन गुरुदेवांनी नंद्यालच्या दिशेने प्रयाण केले.

नंद्याल केंद्राला ही गुरुदेवांची पहिली भेट होती. राज्याच्या विविध भागातून आलेले सुमारे २००० अभ्यासी त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते.

# श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया

गुरुदेवांची यात्रा

नोव्हेंबर २००९ | खाजगी वितरणाकरिता | खंड २ अंक ६






नंद्याल करनूल

गुरुदेवांच्या कुटीराकडे जाणारा मार्ग फुलझाडांनी सुशोभित करण्यात आला होता. गुरुदेवांनी प्रथम आपल्या कुटीराचे उद्घाटन केले व नंतर जवळच असणाऱ्या ध्यानकक्षाचे फीत कापून उद्घाटन केले. दुसऱ्या दिवशी १७ सप्टेंबरला एका अभ्यासी कुटुंबाने चालवलेल्या शैक्षणिक संस्थेला गुरुदेवांनी भेट दिली. नंद्यालपासून सुमारे दीड तासाच्या अंतरावर असणाऱ्या करनूल या गावी गुरुदेवांचा पुढचा मुक्काम होता.

सकाळी ११.२० वाजता करनूल येथे पोहोचल्यानंतर गुरुदेवांनी ध्यानकक्षाचे उद्घाटन केले व तो पूज्य बाबूजी महाराजांना समर्पित केला. उपस्थित दीड हजार अभ्यासींसाठी त्यांनी सत्संगाचे संचलन केले. ध्यानकक्षाचाच एक भाग असणाऱ्या आपल्या कुटीराचे त्यांनी यानंतर उद्घाटन केले. गुरुदेव आपल्या कुटीराकडे परतत असताना 'हा आश्रम फार छान आहे' असे एक अभ्यासी म्हणाले. यावर गुरुदेव म्हणाले की ''माझे सर्वच आश्रम उत्कृष्ट आहेत. चांगले आश्रम कोणीही बांधू शकेल, पण मला गरज आहे ती चांगल्या अभ्यासींची.'

संध्याकाळी आपल्या कुटीराबाहेर येऊन गुरुदेवांनी अभ्यासींशी अनौपचारिक वार्तालाप केला.

- ते म्हणाले की ज्याप्रमाणे एखाद्या बालकाला विश्रांतीची गरज असते त्याचप्रमाणे गुरुदेवांच्या वयाच्या लोकांनाही आरामाची जरुर आहे. गुरुदेव पुढ म्हणाले, की महाभारतातील धृतराष्ट्राच्या शब्दात सांगायचे झाले तर–आपल्याला हवे तेव्हा झोप येत नसेल , तर जेव्हा झोप येते तेव्हा झोपायचे असते.
- गुरुदेवांनी सांगितले की ५००० अभ्यासींच्या समुदायाला केवळ ५० वाईट अभ्यासी दूषित करु शकतात. विषाचे काही थेंब मिसळलेल्या दुधाचे उदाहरण त्यांनी या प्रसंगी दिले.
- १६ वर्षे वयाची अभ्यासींची मुले साधनेची सुरुवात करू शकतात का? असे विचारले असता गुरुदेव म्हणाल की १८व्या वर्षापर्यंत थांबणे गरजेचे आहे. लग्न झालेल्या सुखी जोडप्याकडे पाहून जर एखाद्या १२ वर्षाच्या मुलाला लग्न करावेसे वाटले तर त्याची अनुमती नाही. प्रत्येक गोष्टीकरता योग्य वेळ यावी लागते.

१८ सप्टेंबर रोजी सकाळी ७.३० ला सत्संग झाल्यानंतर ९ वाजण्याच्या सुमारास गुरुदेव गडवाल मार्गे कर्नाटकातील रायचूर येथे जाण्यासाठी निघाले. ते गडवाल येथे काही काळ थांबल्यामुळे त्यांच्या दर्शनासाठी प्रतीक्षा करणाऱ्या अभ्यासींना अतिशय आनंद झला. सुमारे अडीच तासांच्या खडतर प्रवासानंतर, खडबडीत व अरुंद रस्त्यांमधून मार्गक्रमण करीत ते रायचूरला पोहोचले.

पूज्य बाबूजी महाराजांनी ज्याचे १९७० मध्ये उद्घाटन केले होते असा रायचूर आश्रम आपल्या मिशनच्या पहिल्या काही आश्रमांपैकी आहे. जवळ–जवळ २२ वर्षांनी गुरुदेव या आश्रमाला भेट देत होते. कर्नाटकाच्या विविध केंद्रांतून आलेल्या सुमारे १३०० आभ्यासींनी गुरुदेवांचे स्वागत केले. ध्यानकक्षाचाच एक भाग असणाऱ्या आपल्या कुटीराचे गुरुदेवांनी उद्घाटन केले.

दुसऱ्या दिवशीच्या सत्संग व नाश्त्यानंतर सकाळी ७.४५ वाजता गुरुदेवांनी २५० कि.मी. च्या हैदराबादच्या प्रवासाचा प्रारंभ केला. १०० कि.मी. च्या प्रवासानंतर मेहबूबनगर येथील एका विश्रामगृहात ते थोड्या विश्रांतीकरिता थांबले. परंतु गुरुदेवांना तेथे विश्रांती घेणे अशक्य झाले, कारण सुमारे १०० अभ्यासींचा समुदाय विश्रामगृहाबाहेर त्यांची प्रतीक्षा करीत होता. गुरुदेव म्हणाले, की वाट पहाणाऱ्या अभ्यासींना भेटणे यासाठी ते कर्तव्याने बांधील आहेत. ते विश्रामगृहाबाहेर आले, त्यांनी उपस्थितांना सिटींग दिले, स्थानिक प्रशिक्षकाकडे केंद्राबद्दल चौकशी केली. प्रशिक्षकाचे कौतुक करुन समाधान व्यक्त केले. गुरुदेवांनी पुढच्या प्रवासाची सुरुवात लवकरच केली व वाटेत भोजनासाठी काही काळ थांबले. जवळ–जवळ ८ तासांच्या खडतर प्रवासानंतर गुरुदेव तुमकुंठा येथे सायंकाळी ४ वाजून २० मिनिटांनी पोहोचले. आश्रमाच्या मुख्य दरवाज्यापासून ते गुरुदेवांच्या कुटीरापर्यंत स्तब्धपणे उभ्या असणाऱ्या अभ्यासींनी त्यांचे प्रेमादरपूर्वक स्वागत केले. मोठ्या प्रवासाने थकलेले असूनही गुरुदेव आनंदी दिसत होते.

२० सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी गुरुदेव ध्यान–कक्षात हजर होते. ६००० अभ्यासींची क्षमता असणारा, संपूर्णतया भरलेल्या कक्षाकडे ते प्रसन्नतेने पहात होते.

सभास्थानी भंडाऱ्याप्रमाणे वातावरण होते. आजुबाजूच्या राज्यांमधूनही लोक आलेले होते. प्रत्येकी ८०० अभ्यासी राहू शकतील असे ५ विशाल तंबू उभारून रहाण्याची सोय समारंभास्थानी करण्यात आली होती. सुमारे ७००० अभ्यासी व त्यांची मुले या समारंभास उपस्थित होते.

रायचूर मेहबूबनगर





# श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया

गुरुदेवांची यात्रा

नोव्हेंबर २००९ | खाजगी वितरणाकरिता | खंड २ अंक ६






२१ सप्टेंबरला सकाळी ७ वाजता बंधू अजय यांनी सत्संगाचे संचालन केले. संध्याकाळी भगिनी सौम्याने भरतनाट्यम नृत्य सादर केले. यशोदामाता व तिचा प्रिय पुत्र भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रेमावर आधारित हा एक तास चालणारा कार्यक्रम बघण्यासाठी स्वत: पू. गुरुदेव ध्यानगृहामध्ये उपस्थित होते.

२२ सप्टेंबरला सकाळी १०.३० वाजता, निघायची वेळ झाली होती. पू. गुरुदेवांच्या जाण्याच्या मार्गावर सर्व अभ्यासींनी शिस्तीत रांगेत उभे राहून पू. गुरुदेवांप्रती असलेल्या प्रेमळ कृतज्ञतेचे प्रदर्शन केले. पू. गुरुदेवांनी ती रात्र एका स्थानिक अभ्यासीच्या घरी व्यतित केली ज्याचे घर विमानतळापासून फक्त ३० मिनीटांच्या अंतरावर होते. दि. २३ रोजी कलकत्त्याला निघण्याअगोदर पू. गुरुदेवांनी आपला वेळ शांततेत व विश्रांती घेण्यात घालवला.

अशयाप्रकारे आपल्या पू. गुरुदेवांचा आंध्रप्रदेश, कर्नाटक व पून्हा आंध्रप्रदेशातून रस्त्याद्वारे केलेला १० दिवसांचा प्रवास पूर्ण झाला. करूणा, प्रेम, कटिबद्धता व निकड या गोष्टींनी या प्रवासास मुर्त रुप दिले ज्यामध्ये 'त्यांनी' इतर सर्व कामे सांभाळून १० नवीन प्रशिक्षकांना तयार केले. नंद्याल येथे एका १० वर्षाच्या किशोर मुलाने पू. गुरुदेवांना त्यांची प्रथम भेट असल्याने अजुन एक दिवस रहाण्यासाठी अतिशय प्रेमळपणे विनंती केली. यावेळी पू. गुरुदेवांनी त्याला प्रश्न विचारला की, "असे काय आहे की जे एका वयस्कर व्यक्तीकडे कमी आहे आणि तरुण व्यक्तीकडे जास्त आहे?" त्यामुलाने यावर बरीच वेगवेगळी उत्तरे दिली. शेवटी पू. गुरुदेवांनी सांगीतले की याचे उत्तर म्हणजे 'वेळ'. ते म्हणाले की "तु तरुण मुलगा आहेस आणि तुझ्याकडे बराच वेळ आहे; मी एक वयस्कर व्यक्ती आहे आणि कमी वेळात मला बरीच कामे करावयाची आहेत आणि त्यासाठीच मला कुरनुलला जाणे आवश्यक आहे." त्यांच्या संपूर्ण प्रवासात याच निकडीचे प्रदर्शन होत होते हे वेगळे सांगायची गरज नाही.

## कलकत्ता

दि. २३ रोजी पू. गुरुदेवांचे येथे आगमन झाले व येताच ते सरळ आश्रमामध्ये गेले. आंध्रप्रदेश व कर्नाटकच्या अतिशय धकाधकीच्या प्रवासानंतर त्यांनी संपूर्ण दिवस विश्रांती घेतली. दि. २४ रोजी संध्याकाळी व २५ तारखेला सकाळी व संध्याकाळी पू. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. २६ तारखेला सत्संगानंतर पू. गुरुदेवांनी ४० सहभागींसह पहिल्या भारतीय शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. त्यांनी सहभागींना आंतरिक शोधाची वृत्ती विकसीत करण्याचे व शहाणपण अर्जित करण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी सर्वांना केवळ मेंदूकडे लक्ष न देता हृदयाकडेदेखिल लक्ष देण्यास सांगितले. (http://www.sahajmarg.org/literature/online/speeches/the-spirit-of-inquiry). बंधू बालसुब्रमण्यम यांनी 'सहजमार्गाचे नियम' या विषयावर बोलतांना शिक्षण व शहाणपणा आणि गुरुप्राप्ती यांवर वेदांमध्ये काय सांगितले आहे यांवर भाष्य केले.





कलकत्ता



खरगपूर

## खरगपूर

दि. २६ रोजी संध्याकाळी पू. गुरुदेव बंधू अजय यांच्या निवासस्थानी जाण्यास निघाले जेथुन ते दुसऱ्या दिवशी सकाळी क्रेस्ट खरगपूरसाठी रवाना झाले. ते तेथे सकाळी सुमारे ११ वाजता पोहोचले व आपल्या कक्षामध्ये थोडी विश्रांती घेतल्यानंतर ते संपूर्ण परिसरास फेरफटका मारण्यास निघाले. त्यांनी ध्यानगृह, कार्यालयीन कक्ष, ग्रंथालय, संचालकांचे निवासस्थान व कार्यालय व शिक्षकांच्या कक्षाला भेट दिली. कामाच्या दर्जाबद्दल ते आनंदी दिसत होते. यावेळी त्यांनी स्वयंपाकघराचेदेखिल ऊद्‌घाटन केले. उपहारगृहाला भेट दिल्यानंतर ते शेवटी अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा वर्गामध्ये पोहोचले. ते तेथे थोडावेळ बसले. यावेळी अनौपचारिकरित्या बोलतांना ते म्हणाले, "जास्तीत जास्त ऊत्पादनासाठी कमीतकमी ऊर्जा/कच्चा माल वापरण्यामध्ये कार्यक्षमता दिसून येते. ईश्वराची व्याख्या म्हणजे शुन्य कच्चा माल व अनंत ऊत्पादन. हेच साध्य करण्यासाठी आपणं झटले पाहिजे."

शिष्यवृत्ती कार्यक्रमाचे वेळापत्रक सकाळी ५ ते रात्री १० असे अत्यंत व्यस्त होते. यांवेळी अनेक वेगवेगळ्या विषयांवर भाषणे झाली. या भाषणांमध्ये मिशनमधील सेवाकार्य, दहा नियम व चारित्र्य निर्माण, संयम व करुणा, प्रसाद व बोधचिन्ह, आपले तिनही गुरुदेव, सहजमार्गाचे मूळ, नैतिकता व तत्वे, बदल, सततस्मरण, एस.एम.एस.एफ., स्मृती, एस.आर.सी.एम., एस.एच.पी.टी., केंद्रास क्रियाशिल कसे करावे, खुल्या चर्चासत्राचे आयोजन कसे करावे?, आदींचा समावेश होता.

एका संध्याकाळी अभ्यासींसोबत बसले असतांना इच्छांना कसे नाहिसे करावे या प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले आपण लहान इच्छांपासून सुरुवात केली पाहिजे व नंतर मोठ्या इच्छांकडे वळले पाहिजे.

२८ सप्टेंबर रोजी ध्यानकक्षाची फीत कापून गुरुदेवांनी क्रेस्ट– खरगपूरचे औपचारिक अनावरण केले. सत्संगानंतर त्यांनी क्रेस्टच्या उद्दिष्टांबद्दल माहिती दिली व केवळ भगवद्गीतेवर एक संपूर्ण कार्यक्रम करावा अशी इच्छा प्रदर्शित केली. आपण सर्वांनी रोज भगवद्गीतेचा एक अध्याय वाचावा, त्यावर मनन करावे व त्याचे सार

# श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया

गुरुदेवांची यात्रा

नोव्हेंबर २००९ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ६






गुरुदेवांचे कुटीर प्रशासकीय इमारत जेवण घर व स्वयंपाक घर वसतिगृह ध्यानकक्ष

समजून घ्यावे असे ते या प्रसंगी म्हणाले. खरगपूरचे क्रेस्ट केंद्र हे बॅंगलोरहून वेगळे असेल. 'नीतितत्वे व नीतिमत्ता' यावर त्याचा अधिक भर असेल.

(http://www.sahajmarg.org/literature/online/speeches/dare-to-think)

दमट हवामान व अविश्रांत परिश्रम करावयास लावणारे वेळापत्रक असूनही शिष्यवृत्तीधारकांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता याचे एकमेव कारण म्हणजे पूज्य गुरुदेवांची उपस्थिती होय. ३० तारखेला संध्याकाळी समारोपाच्या भाषणात गुरुदेव म्हणाले, " ....संतांचे गुण काय असतात? सर्वात महत्त्वाचा गुण म्हणजे अचूक समतोल. वेदनेत तसेच सुख-संवेदनेत काहीही फरक नाही. आरोग्य तसेच अनारोग्यात- काहीही फरक नाही. आतून व बाहेरून ते सम-समान असतात- याचाच अर्थ- पूर्ण संतुलन. हे लक्षात असूद्या, की ही संधी सर्वांनाच मिळते असे नाही, ना ती वारंवार मिळते. तुम्हाला ती लाभली आहे, ती केवळ माझ्या गुरुदेवांच्या कृपेने. जे काही तुम्हाला येथे (सहजमार्गात) घेऊन आले आहे, प्रार्थना करा की ते तुम्हाला येथे कायमचे ठेवो सतत शिकण्याच्या दृष्टीने, सतत करण्याच्या दृष्टीने व सतत आचरणाच्या दृष्टीने. हे लक्षात असूद्या की याची जबाबदारी तुमची स्वतःची आहे, परमेश्वराची नाही."

http://www.sahajmarg.org/literature/online/speeches/Only-Purpose-Of-Life)


दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता गुरुदेवांच्या कॉफीपानाच्या वेळी शिष्यवृत्तीधाराकांना व इतर उपस्थितांना त्यांच्या सहवासाचा लाभ मिळाला. विनोदाच्या शिडकाव्याने व गोष्टी सांगून त्यांनी सर्वांना अर्ध्या तासाकरिता मंत्रमुग्ध केले. नाश्त्यानंतर गुरुदेव कलकत्ता येथे जाण्यासाठी निघाले व त्यांचे खरगपूरचे वास्तव्य संपुष्टात आले.

"माझी अशी इच्छा आहे की तुमच्यापैकी प्रत्येकाने आपापल्या श्रध्दा ज्याच्याशी निगडित आहेत (Belief System) त्याचे अवलोकन करावे आणि त्याची शाश्वत सत्य जसे आहे वा जसे असायला पाहिजे त्याबरोबर तुलना करावी. त्याबाबत चर्चा करण्यासाठी, आपले विचार मोकळेपणाने व निर्भयतेने मांडण्यासाठी तुम्ही येथे यावे आणि या संस्थेला तिच्या अस्तित्वाचे उदिष्ट प्राप्त करून द्यावे. या हेतूकरिता या संस्थेची उभारणी झालेली आहे व याच हेतूकरिता तिचा उपयोग झाला पाहिजे." (क्रेस्ट- खरगपूर)



## चेन्नई






२ ऑक्टोबर रोजी गुरुदेव कलकत्त्याहून निघाले, व मणपक्कम आश्रम, चेन्नई येथे दुपारी दोनच्या सुमारास पोचले. बराच मोठा प्रवास केल्यामुळे ते थकल्यासारखे दिसत होते.

दिवाळीच्या आधीचा आठवडा गुरुदेवांनी मणपक्कम आश्रमात शांतपणे व्यतीत केला. ११ तारखेपासून अभ्यासींची आश्रमात रीघ लागू लागली. प्रशासकीय कामांमध्ये व्यस्त असूनही येणाऱ्या अभ्यासींना भेटण्यासाठी गुरुदेवांनी वेळ काढला.

१६ ऑक्टोबर रोजी 'रुची बेकरी' असे नामकरण केलेल्या बेकरी विभागाचे गुरुदेवांनी अनावरण केले. आपल्या गोल्फ कार्टमध्ये बसून जेव्हा ते स्वयंपाक-घरात गेले तेव्हा मार्गाच्या दोन्ही बाजूला उभ्या असणाऱ्या अभ्यासींनी त्यांच्या दर्शनाचा लाभ घेतला. ताज्या बनवलेल्या काही पदार्थांचा गुरुदेवांनी आस्वाद घेतला व तेथे तात्काळ विक्री करून बेकरीचा शुभारंभ केला.

१७ तारखेला दिवाळी म्हणजेच दिव्यांचा उत्सव होता. गुरुदेव स्वतः लवकर उठून तयार झाले होते. पहाटेपासून त्यांची शांतपणे वाट पहाणाऱ्या अभ्यासींना भेटून त्यांनी दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

सुमारे ५००० अभ्यासींसाठी गुरुदेवांनी सकाळच्या सत्संगाचे संचलन केले. यावेळी त्यांनी अनेक नवीन पुस्तकांचे प्रकाशन केले. गुजरातमधून आलेल्या अभ्यासींनी सायंकाळी गरबा नृत्याचे आयोजन केले होते. गुरुदेवांनी हा अर्ध्या तासाचा कार्यक्रम संपूर्ण पाहीला व त्यातील कलाकारांचे उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल अभिनंदन केले. गुरुदेवांच्या कुटीराला दिवे व रोषणाईने सजवले होते, त्यामुळे ते एखाद्या परिकथेप्रमाणे दिसत होते. समारंभाच्या वातावरणामुळे व गुरुदेवांच्या उपस्थितीमुळे अभ्यासींचा आनंद द्विगुणीत झाला होता.

# श्री राम चंद्र मिशन
# एकोज इंडिया

विभागीय कार्यक्रम

नोव्हेंबर २००९ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ६


## अभ्यासी प्रशिक्षण कार्यक्रम

(अभ्यासी ट्रेनिंग प्रोग्राम – ए टी पी)



"आम्ही येथे तुमच्या औत्सुक्याला उत्तेजन देण्यासाठी किंवा बढावा देण्यासाठी नाही आलो. आम्ही येथे, ज्याला बाबूजी महाराज 'चौकशी' म्हणत, त्यासाठी आलो आहोत – Inquiry म्हणजे जाणून घेण्याची भावना. गोष्टींबद्दल जाणून घेणे, गोष्टींच्या आंतरिक स्वरूपाबद्दल जाणून घेणे, जीवनपध्दतींमागील तत्त्वज्ञान जाणून घेणे." – पार्थसारथी राजगोपालाचारी, कोलकाता, २६ सप्टेंबर, २००९

सहजमार्गातील नवीन अभ्यासींसाठी देशभरात सगळीकडे बरेच प्रशिक्षण कार्यक्रम व खुली चर्चासत्रे आयोजित केली जात आहेत. प्रशिक्षक व जाणकार त्यांच्या अनुभवाच्या व एसएमआरटीआयच्या (SMRTI) प्रशिक्षण सामग्रीच्या आधारे नवीन अभ्यासींची मने जागृत करून त्यांना ध्येया पर्यंत पोहोचण्यास प्रेरीत करीत आहेत.

एसएमआरटीआय (SMRTI) लेव्हल–१ प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश नवीन अभ्यासींना साधनेबद्दल मूलभूत व पद्धतशीर माहिती पुरविणे हा आहे. या सादरीकरणात वेगवेगळ्या स्त्रोतातून गोळा केलेल्या सहजमार्ग साधनेच्या प्रमुख अंगांविषयीच्या आपल्या तिन्ही सदगुरूंच्या ध्वनी व चित्रफितींचा समावेश आहे.

ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात घेण्यात आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळांबद्दलच्या अहवालावरून आपल्याला संपूर्ण भारतभरात चालू असलेल्या मिशनच्या कार्याच्या वेगाची कल्पना येते.


चित्तापूर


सेदाम


ग्वालीयर

कन्नड भाषेतील पहिला अभ्यासी ट्रेनिंग प्रोग्राम (ए टी पी) मुलबागल, कर्नाटक येथे ६ सप्टेंबर रोजी बंगळूरुचे बंधू विश्वनाथ व भगिनी विजयालक्ष्मी यांनी संचालित केला. ५० अभ्यासींच्या गटात काही अभ्यासी जवळपासच्या मालूर, काळार व के जी एफ केंद्रामधूनही सामील झाले होते. जवळपास सर्व अभ्यासींनी प्रशिक्षणाचा चांगल्या प्रकारे स्वीकार करीत उत्साहाने सहभाग नोंदवला.

१३ सप्टेंबर रोजी ओरिसातील रुरकेला येथे एटीपीचे अयोजन केले गेले. त्यासाठी २२ अभ्यासी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता करण्यापूर्वी एक प्रश्नोत्तरांचे सत्र आयोजित केले गेले ज्यामुळे अभ्यासींच्या साधनेविषयीच्या शंकांचे निरसन होण्यास मदत झाली.

११ ऑक्टोबर रोजी उत्तर कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यातील चित्तापूर सेंटरमधील अभ्यासींनी कार्यक्रमात भाग घेतला. बंधू प्रल्हाद पाकनीकर व बंधू निजलिंगप्पा यांनी कन्नड भाषांतराचा उपयोग करून हा प्रशिक्षण कार्यक्रम सादर केला. सर्व अभ्यासींनी त्यात सक्रियपणे भाग घेत सादरकर्त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.

गुलबर्गा जिल्ह्यातील सेदाम केंद्रात ३० ऑगस्ट रोजी ३९ अभ्यासींनी या कार्यक्रमात भाग घेतला. बंधू निजलिंगप्पा यांनी तो सादर केला. सर्व अभ्यासींनी लक्षपूर्वक ऐकले व वक्त्याने ते किती जागरूकतेने ऐकत आहेत हे पाहण्यासाठी वेळोवेळी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. बऱ्याच प्रश्नांचा खुलासा केला गेला.

आंध्र प्रदेशातील काकीनाडा येथे ६ सप्टेंबर रोजी एटीपीचे आयोजन केले गेले. त्या झोनमधील हा अशा प्रकारचा पहिलाच कार्यक्रम होता. २० अभ्यासींनी त्यात भाग घेतला. कार्यक्रमाचे संचालन त्या झोनचे एसएमआरटीआयचे प्रभारी बंधू के नागेश्वर राव यांनी केले.

मध्य प्रदेशातील ग्वालीयर केंद्राने जवळपास ५० अभ्यासींसाठी तीन दिवसांचा एटीपी कार्यक्रम १९ ते २१ सप्टेंबरच्या दरम्यान आयोजित केला. मध्य प्रदेशातील विविध केंद्रांमधील जाणकारांनी प्रशिक्षणाचा उद्देश, आध्यात्मिकतेची गरज, स्वयंसेवा व सद्गुरूंबद्दल प्रेम अशा वेगवेगळ्या विषयांवर भाषणे दिली. सद्गुरूंसारखे बनणे (To be like the Master)आणि आता जागृत व्हा (Awaken Now) या दोन डीव्हीडी दाखवण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी अभ्यासींनी त्यांची आध्यात्मिक यात्रा प्रामाणिकपणे चालू ठेवण्याचे वचन दिले.

रविवार ११ ऑक्टोबर रोजी मिशनमध्ये नव्याने सामील झालेल्या ५० अभ्यासींसाठी अलुवा या केरळमधील झोनल आश्रमात मल्याळम भाषेत कार्यक्रम घेतला गेला. सहजमार्ग साधनेशी संबंधित विविध विषयांवर सादरीकरण केले गेले. शंकानिरसनासाठी स्वतंत्र सत्र आयोजित केले गेले ज्यात सर्वांनी उत्साहाने भाग घेतला. ध्यान व शुद्धिकरण, स्मरण व विचार, सद्गुरू व ईश्वर यातील फरकांवर सहभागींनी प्रश्न विचारले. गुरुदेव अलीकडे जोर देत असलेल्या चारित्र्य निर्माणाविषयी व त्याची जबाबदारी व्यक्तीशः आपल्यावर का आहे याविषयी विशद करून सांगण्यात आले.

या सर्व केंद्रांमध्ये समानतेने हे जाणवले की प्रशिक्षण कार्यक्रमाच्या गुणवत्तेमुळे सहजमार्ग साधनेसंबंधी कोणत्याही शंका उरत नाहीत. जरी हा कार्यक्रम नवीन अभ्यासींसाठी असला तरी काही वर्षे साधना करीत असलेल्यांसाठीही तो फारच फायदेशीर ठरला. आपली साधनेबद्दलची समज वाढण्याच्या दृष्टीने मूलभूत तत्त्वांची उजळणी करणे आवश्यक ठरते.



## एचपीसी मॅनेजमेंट डेव्हलपमेंट इन्स्टीव्यूट, पूणे.

पुणे जिल्ह्यातील पिंपरी–चिंचवड येथील अभ्यासींनी 26 सप्टेंबर रोजी हिंदुस्तान पेट्रोलियम कॉरपोरेशन, निगडी यांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले. बंधू सक्सेना यांनी संतुलित आयुष्य कसे जगावे या विषयावर व्याख्यान दिले. सहभागी झालेल्या 50 सदस्यांना सहजमार्ग साधनेची माहिती दिली गेली व त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली गेली.

## अभ्यास वर्ग, इंदोर, मध्य प्रदेश



इंदोर केंद्राने १३ सप्टेंबर रोजी 'मेसेजेस युनिव्हर्सल '(वैश्विक संदेश) या बाबूजी महाराजांच्या पुस्तकाच्या एकत्रित अभ्यासवर्गाचे आयोजन केले. जवळपास ३५ अभ्यासींनी यात भाग घेतला. बंधू तन्वर यांनी पूज्य बाबूजी महाराजांच्या संदेशांमधून खूप शिकायला मिळाल्याचे सांगितले. अभ्यासींना हे समजून आले की, समर्पण ही फक्त बाह्य गोष्ट नाही किंवा फक्त बाह्यात्कारी शरण जाणे नाही, तर ती ऐच्छिक गोष्ट आहे. एका संदेशात यावर जोर देण्यात आला होता की, प्रत्येक अभ्यासीने त्याला गुरुदेवांनी प्रदान केलेल्या आंतरिक उन्नतीशी सुसंगत असे चारित्र्य निर्माण केले पाहिजे.

## सराईग्राम आणि विंध्यानगर, मध्य प्रदेश

११ सप्टेंबर रोजी सराईग्राम येथे जबलपूरच्या गटाने संचालित केलेल्या कार्यक्रमात ३० अभ्यासींनी भाग घेतला. यात सहजमार्ग साधनेच्या आवश्यक पैलूंचा समावेश होता व ध्वनी व चित्रफितींच्या आधारे सादरीकरण करण्यात आले. भगिनी सुनीता शुक्ल यांनी ध्यान व सहजमार्गाच्या दहा सुत्रांवर विवेचन केले. भगिनी अर्चना केसकर प्रार्थना व दैनंदिनी लिहीण्याविषयी बोलल्या तर भगिनी कृष्णा पंड्या शुद्धिकरण व सतत स्मरणाविषयी बोलल्या. यानंतर बंधू आर. के. व्यास यांच्याबरोबर प्रश्नोत्तरांचे सत्र झाले.

विंध्यानगर येथे जवळपास ५० अभ्यासींनी सहजमार्ग – एक पुनरावलोकन असे शिर्षक असलेल्या सत्रात भाग घेतला. बंधू नायक यांनी प्रशिक्षित केलेल्या मुलांनी मूल्यांवर आधारित एक अतिशय परिणामकारक असे सादरीकरण केले. तेथे आलेल्या तज्ञांच्या गटाची भावना आपण शिकवण्यासाठी आलो असूनही शिकायला व अनुभवायलाच जास्त मिळाले अशा कृतज्ञतेची होती.



## उत्तर महाराष्ट्र दौरा

१९ व २० सप्टेंबर रोजी, बंधू वैद्य, बंधू टिल्लू व बंधू गिरीष यांनी काही अभ्यासींसमवेत गुजरात सीमेलगतच्या उत्तर महाराष्ट्रातील काही केंद्रांचा दौरा केला. त्यांनी सत्संग घेतले, स्थानिक गटांशी संवाद साधला, प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले आणि शंका व प्रश्नांचे निरसन करण्यासाठी चर्चासत्र घेतले.

या गटाने दौऱ्यादरम्यान नंदुरबार, जळगाव, भुसावळ येथे भेटी दिल्या. ते सतत स्मरणात होते व त्यांची ह्रदये गुरुदेवांप्रती प्रेमाने व कृतज्ञतेने भरून गेली होती. या भेटींमुळे त्या केंद्रातील अभ्यासींमध्ये आनंदाचे व उल्हासाचे वातावरण तयार झाले.

## मिशनचा प्रथम वर्धापन दिन, भद्रावती, कर्नाटक.



११ ऑक्टोबर हा दिवस शिमोगा जिल्ह्यातील भद्रावती येथील मिशनचा प्रथम वर्धापन दिन म्हणून साजरा झाला. वर्षभरापूर्वी थोडेसेच अभ्यासी असणाऱ्या या केंद्रात आता ४० अभ्यासी आहेत. हे सर्व तेथील स्थानिक अभ्यासींचा उत्साह, बाहेरील प्रशिक्षकांच्या भेटी व सर्वात जास्त म्हणजे गुरुदेवांची कृपा यामुळे शक्य झाले.

सत्संगानंतर बंधू सी आर एन मूर्थी व बंधू बी. एस. राव यांची भाषणे झाली. विभाग प्रमुख बंधू शरत हेगडे यांनी अभ्यासींना स्वत:वर काम करण्यास व या पद्धतीपासून लाभ उठवण्यास प्रेरीत केले. स्थानिक अभ्यासींनी त्यांचे अनुभव कथन केले व साधनेच्या विविध पैलूंबाबत स्पष्टीकरण देण्यासाठी सत्र आयोजित केले गेले. लहान मुलांनी दहा सूत्रांवरील नाटिका सादर केली. भद्रावतीच्या ज्या अभ्यासींनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते ते उत्साहाने भविष्यात आपण मिशनसाठी काय करू शकतो याच्या योजना आखत होते.

## मूल्याधारित शिक्षण कार्यशाळा, जयपूर.

२३ ऑगस्ट २००९ रोजी जयपूर येथे ही कार्यशाळा घेण्यात आली, ज्यात एकूण १०० अभ्यासींनी भाग घेतला. एसएमआरटीआयच्या या सादरीकरणात प्राथमिक शाळेतील मुलांसाठी असलेल्या त्यांच्या अभ्यासक्रमातील उदाहरणांचा समावेश होता. तज्ञांनी फोटोंच्या व चित्रफितींच्या आधारे स्वच्छता, प्रामाणिकपणा, खरे बोलणे, शिस्त, साधी राहणी व उच्च विचारसरणी यावर विश्वास, वेळेचे नियोजन इ. गोष्टी अतिशय सुंदरपणे विशद केल्या.



श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
विभागीय कार्यक्रम
नोव्हेंबर २००९ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ६

## मूल्याधारित प्रशिक्षण – एर्नाकुलम, केरळ.



लहान मुले म्हणजे या जगाचे भावी नागरिक आहेत आणि आपण त्यांना जी मूल्ये शिकवतो त्यावर बरेच काही अवलंबून आहे. २७ सप्टेंबर रोजी एर्नाकुलम केंद्रात मूल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला गेला. एसएमआरटीआयचे विभाग प्रमुख बंधू ए. माधवन यांनी संचालन व सादरीकरण केले. त्यात ७१ अभ्यासी व १३ मुलांनी भाग घेतला. परस्पर संवादात सर्व मुले अतिशय आनंदाने सहभागी झाली. मुलांनी मिशनची प्रार्थना म्हटली व ती काही मिनिटे डोळे मिटून बसली. मूल्यांवर आधारित गोष्टी सांगितल्या गेल्या व त्यातून त्यांना काय शिकायला मिळाले असे विचारले गेले. त्यांच्या नाविन्यपूर्ण दृष्टिकोनांबद्दल ऐकणे खरोखरच मनोरंजक होते.

कार्यकर्त्यांना/स्वयंसेवकांना मुलांसाठी मूल्याधारित शिक्षण वर्ग कसे घ्यायचे याचे प्रशिक्षण दिले गेले. मूल्याधारित शिक्षण वर्ग हे ज्ञान मिळविण्यासाठी नसून सूज्ञपणा वाढवण्यासाठी आहेत. मुलांना असे वाटले की मिशनच्या विकासात त्यांचाही सहभाग असावा.

## लखनौ आश्रम वृक्षारोपण

या वर्षाऋतुत लखनौ आश्रमात जवळपास १००० वृक्षांची लागवड करण्यात आली शिवाय आणखी २०० फळझाडांची लागवड करण्याची योजना आहे.

लखनौ विकास प्राधिकरण यांनीही यात सहभागी होत ३०० रोपे उपलब्ध करून दिली. ३० ऑगस्ट २००९ रोजी सुभाष पब्लिक स्कुल व राजहंस पब्लिक स्कुलच्या २५० विद्यार्थ्यांनी आश्रमाला भेट देऊन या कार्याला हातभार लावला.

## स्थानिक मेळावा, तिप्तूर, कर्नाटक.

दिनांक १० व ११ ऑक्टोबर रोजी ७ केंद्रातील (हासन, तुमकूर, मधुगिरी, सी. एन. हळ्ळी, हुळियार, चिक्कमंगळूर आणि तिप्तूर) १२० अभ्यासींनी तिप्तुर येथील दोन दिवसांच्या परिसंवादात भाग घेतला ज्याचा विषय होता – स्वत:चे पुर्नमूल्यांकन करणे.

पहिला दिवस गुरुदेवांचे अगदी अलीकडच्या संदेशांचे वाचन व ठराविक कालावधीनंतर अभ्यासींनी स्वत:चे मूल्यांकन करण्याची निकड या विषयावर व्यतीत



करण्यात आला. संध्याकाळच्या सत्संगानंतर 'सी ऑफ लव्ह' (प्रेम सागर ) नावाची व्हीसीडी दाखवण्यात आली व त्यानंतर अभ्यासींनी सहजमार्गातील अनुभवांचे आदानप्रदान केले.

दुसऱ्या दिवशी सेवेचे महत्व व केंद्रांमध्ये चांगल्या गटांची आवश्यकता यावर चर्चा झाली. प्रत्येक केंद्रासाठी पुढील एक वर्षासाठी एक कृती योजना आखण्यात आली जेणेकरून पायाभूत संघटना (टीम्स) निर्माण होतील. संध्याकाळच्या सत्संगानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

सहभागींना दोन सुंदर दिवस आश्रमात घालविण्याची संधी मिळाली. सर्वांनाच असे स्थानिक मेळावे वारंवार होण्याची आवश्यकता वाटली जेणेकरून ध्येयावरील लक्ष स्थिर राहण्यास मदत होऊ शकेल.

## जीवनातील ध्यानाचे महत्व, काशीपूर.

१० सप्टेंबर रोजी चंद्रावती गर्ल्स डीग्री कॉलेज येथील शिक्षक, पदवी धारक व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसहित ११० जणांसाठी जीवनातील ध्यानाचे महत्व या विषयावर व्याख्यान झाले.

बंधू डॉ. आलोक टंडन यांनी विषयाची ओळख करून दिली आणि अतिशय सोप्यारितीने जनसामान्यात असलेली ध्यानाची संकल्पना व ध्यान यातील फरक समजाऊन सांगितला. राम चंद्र मिशनचे सचीव बंधू आर. पी उमाशंकर यांनी भौतिक उपलब्धींसाठी केले जाणारे ध्यान व आध्यात्मिक उपलब्धींसाठी केले जाणारे ध्यान यातील फरक हळूवारपणे उलगडून दाखवत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

त्यांनी विद्यार्थ्यांना दिवसभरातील खरोखरच परिणामकारकरित्या वापरला जाणारा वेळ व वाया जाणारा वेळ यावर चिंतन करण्याचा आग्रह केला. त्यांनी अतिशय गमतीदार उदाहरणातून हे दाखवून दिले की, कशा रितीने एकमेकांवर टीका करण्यासाठी वापरला जाणारा वेळ अतिशय उपयुक्तपणे ध्यानासाठी वापरला जाऊ शकतो. एक उत्साहपूर्ण प्रश्नोत्तरांचे सत्र झाले व त्यानंतर बंधू आलोक यांनी सहजमार्गाबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. त्यात रस दाखवलेल्या लोकांना पुस्तके व पत्रिका वाटून पद्धतीबद्दलच्या अधिक माहितीसाठी स्थानिक प्रशिक्षकांशी संपर्क साधण्यात सांगण्यात आले.





श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया

विभागीय कार्यक्रम

नोव्हेंबर २००९ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ६


## प्रगत युवा मेळावा बंगलोर – २ ते ४ऑक्टोबर



ज्या युवकांना सहजमार्गात येऊन बराच काळ लोटला आहे व जे आपली प्रेरणा कायम ठेवण्यासाठी काहीतरी नवीन शोधत आहेत अशा युवकांसाठी या मेळाव्याचे आयोजन केले गेले होते. द. कर्नाटक विभागातील विविध केंद्रांच्या केंद्रप्रमुख / प्रशिक्षकप्रमुखांद्वारे या युवकांची (२० ते ३५ वर्षे) निवड केली गेली. बहूसंख्य सहभागी हे मिशनमध्ये ३ वर्षापेक्षा अधिक काळापासून साधना करीत होते.

सकाळी ४.३० वा. ध्यानाने दिवसाची सुरुवात झाली, औपचारिक सत्र सुरु होण्यापूर्वी व्यायाम / योगा व सत्संग झाला. सकाळच्या दोन औपचारिक सत्रांनंतर खेळ व दोन तासाचे सेवाकार्य केले गेले. या सत्रांमध्ये सहभागींना अधिक खोलात जाऊन अंतर्मुख होऊन गुरुदेव, मिशन व पदधती याचे सार समजून घेण्यास मदत झाली. त्यांनासुद्धा समुहामध्ये चर्चा करण्याची व आपले अनुभव व दृष्टीकोन इतरांसमवेत वाटण्याची संधी देण्यात आली. यामध्ये अंतर्भूत असलेल्या विविध विषयांमध्ये एक गुरु, एक मिशन व एक पद्धती, पात्र बनण्यासाठी सेवा करा, आज्ञाधारकता अध्यात्मिकतेचा पाया, आंतरिक विश्वाची ओळख, चारित्र्याविना अध्यात्मिकता हे एक मृगजळ आणि सहजमार्ग व उद्याचे विश्व आदिंचा समावेश होता. सहभागींमध्ये प्रेम व बंधूत्वाची भावना अधिकच दृढ झालेली बघावयास मिळत होती.

सहभागींद्वारे आपापल्या केंद्रांमध्ये अशाच प्रकारचा कार्यक्रम आयोजित करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला. सहभागी आणि आयोजकांमध्ये, आपली मते मांडतांना व त्याची उत्तरे आपल्या आतमधूनच शोधण्याचा आनंद मिळवतांना मोकळेपणा दिसून येत होता.

## उत्तराखंड प्रशिक्षक मेळावा

दि. २० व २१ सप्टेंबर रोजी सतखोल येथे आयोजित उत्तराखंड विभागासाठीच्या दोन दिवसीय मेळाव्याला ४१ प्रशिक्षकांची हजेरी होती. मेळाव्याची संकल्पना होती “संख्या व गुणवत्ता प्राप्त करणे”.

पहिल्या दिवशी विभागप्रमुख बंधू शुपाल यांनी कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी प्रत्येक केंद्रामध्ये सुधारणेस कोठे वाव आहे याचा आढावा घेतला व त्यावर आपला अहवाल सादर केला. यासाठीची माहिती प्रशिक्षक अहवाल व सभासदांच्या माहितीवर आधारित होती. आश्रम, ध्यानगृह तसेच पू. गुरुदेवांच्या केंद्रांना भेटी यांच्या नियोजनासाठी वापरावयाचा प्रमाणित नमुना त्यांनी सादर केला. स्मृतीच्या प्रगत प्रशिक्षण कार्यक्रम भाग १ याविषयी सर्व प्रशिक्षकांना माहिती देण्यात आली.

संध्याकाळी बंधू आलोक यांनी काशीपूर केंद्राचे उदाहरण देऊन केंद्रातील विविध कार्यांचे सादरीकरण केले. त्यानंतर खुले सत्र व पूर्ण दिवस कार्यक्रम कसे आयोजित करावेत यावर सादरीकरण करण्यात आले.



दुसऱ्या दिवसाची सुरुवात “इंटरनेटद्वारे होणारे संदेशवहन” याबद्दलच्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाने झाली. मिशनच्या संकेतस्थळावरील विविध भागांची सफर यामध्ये घडविण्यात आली. यानंतर बंधू ए.पी.दुराई यांचे सुरक्षेवरील सादरीकरण दाखवण्यात व समजवण्यात आले.

गुणवत्तेमध्ये व अभ्यासींच्या संख्येमध्ये सुधारणा याविषयावर सादरीकरण करण्यात आले व गट–चर्चा केली गेली. यानंतर पू. गुरुदेवांनी तिरुपूर येथे प्रशिक्षकांसमोर केलेल्या भाषणातील प्रमुख मुद्द्यांचे सादरीकरण करण्यात आले व त्यानंतर पू. गुरुदेवांच्या चित्तुर येथील भाषणाचे हिन्दी भाषांतर ऐकविण्यात आले.

यावेळी असा निष्कर्ष काढण्यात आला की संख्या वाढविण्यासाठी प्रशिक्षकांना जास्त काम करावे लागेल तर गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांना आपल्या कामामध्ये आपले हृदय ओतावे लागेल. या चिंतनपूर्ण व अभ्यासपूर्ण सत्राची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली.

## जग्गमपेट आंध्रप्रदेश येथील खुले सत्र

जग्गमपेठ हे गाव आंध्र प्रदेशातील उत्तर झोन 'सी' मध्ये काकीनाडापासून



३५ किमी अंतरावर आहे. पाच लाख लोकसंख्येचे हे एक औद्योगिक शहर आहे. या शहरात प्रामुख्याने भाताच्या गिरण्या आणि घरांची कौले तयार करणा–या उद्योगांचा समावेश आहे.

या उपकेंद्राची सुरूवात २००६ साली मोजक्या अभ्यासींनी झाली. लवकरच, साधना पद्धती आणि सहजतेच्या प्रेरणेने नियमीत अभ्यास करणा–यांची संख्या ४० पर्यंत पोचली. स्थानिक लोकांची उत्सुकता पाहून, बंधू पी. सुर्यनारायण यांनी १४ सप्टेंबर रोजी एक खुले सत्र आयोजित केले. या सत्रात सर्व वयोगटातील २०० जणांनी भाग घेतला.

धर्म म्हणजे बाह्यदर्शनी देव तर अध्यात्मिकता म्हणजे आंतरिक देव अशी व्याख्या करण्यात आली, अध्यात्मिकतेची गरज हा विषयही मांडण्यात आला. शेवटी असे सुचविण्यात आले की अध्यात्मिकता हा विषय ऐच्छिक नसून अनिवार्य आहे, आणि सहज मार्ग साधना कशी कुठल्याही स्थितीतून मनुष्याला पूर्णत्वाकडे नेते.

बंधू के. यदुसुर्या आणि भगिनी के. ज्योति हे दोघे वरील विषयांवर बोलले. बंधू डी. भास्कर राव आणि वी. वेंकट राव या दोघांनी सहज मार्ग साधनेमुळे घडलेल्या स्वपरिवर्तनांबद्दल माहिती दिली.

श्री राम चंद्र मिशन
एकोज इंडिया
विभागीय कार्यक्रम
नोव्हेंबर २००९ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ६

## कोईम्बतुर केंद्र कल्पक असा (नाविन्यपूर्ण) पूर्ण दिवस कार्यक्रम

कोईम्बतुर केंद्राने प्रत्येक रविवारी पूर्ण दिवस कार्यक्रम करण्याऐवजी पून्हा पहिल्याप्रमाणे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी पूर्णदिवस कार्यक्रम करण्याचे ठरविले. यामुळे प्रत्येक आठवड्यात येणाऱ्या केवळ काही समर्पित अभ्यासींऐवजी बहूसंख्य अभ्यासींचा सहभाग दिसु लागला. नव्या व जुन्या अभ्यासींना आवडतील अशा विषयांचे विचारपूर्वक नियोजन केले गेले.

अध्यात्मिकतेच्या मार्गावर प्रगतीसाठी सहाय्यक ठरणारे विशेष मौलिक विचार समजून घेण्यासाठी पू. बाबूजी महाराजांचे पूस्तक निवडण्यात आले. आत्तापर्यंत अशाप्रकारे तीन पूस्तके पूर्ण झाली आहेत. ती म्हणजे सहजमार्ग प्रकाशित राजयोगाचा प्रभाव, दहा नियमांची व्याख्या (Commentary on Ten Maxims), सत्योदय. इतर पुस्तके पूढील महिन्यात घेतली जातील. या उपक्रमाचा उपयोग स्वयंसेवक, व्याख्याते, शिक्षक इत्यादींना तर झालाच पण यामुळे अभ्यासींना बाबूजी महाराजांची पूस्तके वाचण्यासाठी उत्तेजन मिळाले.

दुसरा महत्वपूर्ण उपक्रम म्हणजे साधनापद्धती, मिशनचा इतिहास, गुरुदेवांचे जिवन याविषयीच्या प्रश्नांचा समावेश असणारा प्रश्नमंजुषा कार्यक्रम.

“व्हिस्पर्स फ्रॉम दि ब्राइटर वर्ल्ड” च्या वाचनाने होणारे फायदे याविषयावर एका सत्राचे आयोजन केले गेले होते.

समूहचर्चेकरिता सहजमार्गातील महत्वाची उद्धरणे जसे की “गुरुदेवांना सिंव्ह हवेत बकऱ्या नकोत” निवडण्यात आली. व या विषयावर गुरुदेवांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी त्यांच्या साहित्याचे वाचन करण्यात आले.

## उत्तर कर्नाटक खुले चर्चासत्र

दि. १ ऑक्टोबर रोजी बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण येथील बसवेश्वर इंग्लिश माध्यमाच्या शाळेमध्ये एका सत्राचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती निर्मला शेटगर यांच्यासह शाळेच्या ३० शिक्षकांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. आपल्या जिवनातील अध्यात्मिकतेची गरज याविषयावर बंधू श्रीकांत जोशी यांनी हिंदीतून आपले विचार मांडले. बंधू मल्लिकार्जून उप्पीन हे मालिक, मिशन व पद्धती यांवर बोलले. दोन्हीही भाषणे खुपच प्रभावकारी ठरली. यानंतर उपस्थितांना पत्रके वितरीत करण्यात आली.

असेच एक सत्र ११ ऑक्टोबर रोजी, गुलबर्गा जिल्ह्यातील चित्तूर केंद्रामध्ये ३० मुमुक्षूंसाठी आयोजित करण्यात आले. बंधू देवेंद्रप्पा यांनी श्रोत्यांचे स्वागत केले. अध्यात्मिकतेची गरज याविषयावर बंधू गजेंद्रसिंह यांनी हिंदीतून विवेचन केले. मालिक, मिशन व पद्धती यावर बंधू राजू काशमपूरकर यांनी कानडीमधून माहिती दिली.


१३ ऑक्टोबर रोजी सुमारे ३० रेल्वे कर्मचारी गुलबर्गा रेल्वे स्थानकाच्या व्यवस्थापकांच्या कार्यालयामध्ये एकत्र जमले होते. यावेळी बंधू गजेंद्रसिंह यांनी अध्यात्मिकता व सहजमार्गाविषयी थोडक्यात माहिती दिली. बंधू श्रीकांत जोशी सहजमार्ग व आपल्या मिशनविषयी बोलले. सत्राचा समारोप करतांना बंधू महेश देशपांडे यांनी सहजमार्गाच्या गुरुपरंपरेविषयी माहिती दिली.







## नविन प्रकाशने

“कंप्लिट वर्क्स ऑफ रामचंद्रा”चे पुनर्मुद्रण. हि विशेष आवृत्ती ३ खंडांच्या एकत्रीत संचामध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.





माझे गुरुदेव
मराठी




हार्टस्पिक २००३



हार्टस्पिक २००४
व्हॉल्यूम २– कन्नड


सहजमार्गाची तत्वे ११
तामिळ



सहजमार्ग प्रकाशित
राजयोगाचा प्रभाव –
स्पॅनिश



सहजमार्ग के दस नियमों
की व्याख्या – विशेष



सत्योदय
खास आवृत्ती



हृदयीचे हृदयी भाग १
मराठी

# श्री राम चंद्र मिशन एकोज इंडिया

प्रकाशाची केंद्रे

नोव्हेंबर २००९ खाजगी वितरणाकरिता खंड २ अंक ६










## बाबूजी मेमोरियल आश्रम, मुंबई







भारताच्या वाणिज्य राजधानीतील या आश्रमाचे उद्घाटन पूज्य गुरुदेवांनी वसंत पंचमीच्या दिवशी, दिनांक ६ फेब्रुवारी २००४ रोजी केले होते. रायगड जिल्ह्याच्या पनवेल शहरात वसलेला हा आश्रम 'पनवेल आश्रम' या नावाने सर्वसाधारणपणे ओळखला जातो. पनवेल हे शहर मुंबई-पुणे द्रुत-गती महामार्गावर स्थित असून मुंबई शहरापासून सुमारे २२ कि.मी. अंतरावर आहे. ०.७५ एकरांच्या जागेवर हा आश्रम उभा असून चांगू काना ठाकूर शाळेच्या समोर आहे. पनवेल रेल्वे स्थानकापासून तो चालण्याच्या अंतरावर आहे.

आश्रमाच्या बांधकामापुढील सर्वात मोठे आव्हान म्हणजे मुंबईतील मालमत्तेच्या जबरदस्त किमती हे होते. अभ्यासींचे अविरत प्रयत्न व गुरुदेवांचे प्रोत्साहन आणि चिकाटी यामुळेच आज हा आश्रम मोठ्या दिमाखात उभा आहे.

२४ जानेवारी १९९९ रोजी गुरुदेवांनी या जागेची निवड केली. या ठिकाणी त्यांनी जेव्हा सत्संगाचे संचलन केले आणि या जागेची निवड आश्रमासाठी निश्चित केली तेव्हा उपस्थित अभ्यासींना असीम तृप्तीची अनुभूती झाली. गुरुदेवांनी या आश्रमाचे नामकरण 'बाबूजी मेमोरियल आश्रम' असे केले. भारतभरातील एकूण पाच बाबूजी मेमोरियल आश्रमांपैकी हा एक आहे.

गुरुदेवांसाठी काम करण्याची सुसंधी प्राप्त झालेल्या अनेक अभ्यासींच्या सहकार्याने आश्रमाचे बांधकाम सुमारे दीड वर्षांच्या कालावधीत पूर्ण झाले.

आश्रमाची इमारत दोन मजली असून गुरुदेवांचे कुटीर, जेवण घर, स्वयंपाक घर व भगिनींसाठी वसतिगृह तळमजल्यावर आहे. अभ्यासींना दिलेल्या खोल्या व बंधुंसाठी वसतिगृह पहिल्या मजल्यावर आहे. ध्यानकक्ष दुसऱ्या मजल्यावर आहे. देखभाल व विकास याकरिता एक एकराचा हरित प्रदेश सिडकोने आश्रमाला दिला आहे. गुरुदेवांनी नुकतीच आश्रमाच्या विकासाची परवानगी दिली असून यामध्ये अधिक खोल्या बांधणे व दुसऱ्या मजल्यावर, ध्यानकक्षाच्या बाजूला गुरुदेवांसाठी कुटीर बांधणे याचा समावेश आहे.

मुंबई व आजु-बाजूच्या परिसरातील अभ्यासींचे जीवन अत्यंत धावपळीचे व दगदगीचे असते. रोजच्या आयुष्यातील चिंता व तणाव विसरण्याकरिता आणि गुरुदेवांच्या असीम कृपेच्या सागरात विश्रांती घेण्याकरिता ते या आश्रमात सतत येण्याचा प्रयत्न करतात.









**To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india**
**For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org**



© 2009 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved.
"Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.